महाराष्ट्र विधिमंडळ कामकाजातील आदिवासी सदस्यांचा सहभाग : एक चिकित्सक अभ्यास (विशेष कालखंड 2009 ते 2019)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीकरिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा

-: संशोधक :-

गारोळे पिराजी गंगाधर

एम.ए. (राज्यशास्त्र) सेट, बी.एड

-: मार्गदर्शक :-

प्रा.डॉ.भालेराव सुरेश सखाराम

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

बी रघुनाथ महाविद्यालय,परभणी

-:संशोधन केंद्र :-

ज्ञानोपासक महाविद्यालय,परभणी

सप्टेंबर-2022

महाराष्ट्र विधिमंडळ कामकाजातील आदिवासी सदस्यांचा सहभाग : एक चिकित्सक अभ्यास (विशेष कालखंड 2009 ते 2019)

❖ प्रस्तावना

भारतीय संविधानात्मक इतिहासाच्या दृष्टीकोनातून आणि प्रांतीय स्तरावर कायदेमंडळ स्थापन करण्यामध्ये 1861 च्या कायद्याला फार महत्त्व आहे.1861 च्या कायद्यानुसार प्रांतीय स्तरावर कायदेमंडळांची तरतूद करण्यात आली.या कायद्यानुसार मुंबई व मद्रास या दोन प्रांतामध्ये कायदेमंडळ निर्माण करण्याची तरतूद करण्यात आली. त्यानंतर 1909 मध्ये मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्यानुसार केंद्रीय कायदेमंडळाप्रमाणे प्रांतीय कायदेमंडळाच्या सदस्य संख्येत वाढ करण्यात आली. 1919 चा भारत प्रशासन कायदा (मॉटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणा कायदा) करण्यात आला. या कायद्याने भारतात प्रांतीय स्तरावर जबाबदार शासन निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले. प्रथमच प्रांतांना काही विषय देण्यात आले. प्रांतांना विषय देऊन या कायद्याने प्रांतसूची तयार करण्यात आली. 1935 चा भारत प्रशासन कायदाने संघराज्य शासन पद्धतीची तरतूद करण्यात आली, केंद्र सरकार व घटक राज्य यांच्यात अधिकाराची विभागणी करण्यात आली. या कायद्याने प्रांतांना स्वायत्तता ची तरतूद करून स्वायत्त घटकाचा दर्जा दिला. 1861, 1909, 1919, आणि 1935 च्या कायद्यांनी भारतामध्ये संघराज्य शासन प्रणालीच्या माध्यमातून राज्य स्तरावर विधिमंडळ निर्माण करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे.

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. 26 जानेवारी 1950 रोजी संसदीय लोकशाही शासन पद्धतीचा स्विकार करून भारत एक गणतंत्र राष्ट्र बनले. संसदीय शासन पध्दतीचा स्विकार केल्यामुळे मध्यवर्ती सरकार प्रमाणेच प्रत्येक घटक राज्यात भारतीय संविधानाच्या कलम 168 व्या कलमानुसार विधानसभा हे कनिष्ठ सभागृह निर्माण करण्यात आले आणि विधान परिषद हे निर्माण करण्याचा अधिकार का घटक राज्यांना दिलेला आहे. घटक राज्यामध्ये तेथील प्रश्नाविषयी, विकास कार्याविषयी व राज्याच्या जनतेकरिता कल्याणकारी योजना राबविण्याचे कार्य राज्य विधिमंडळाच्या माध्यमातून पार पाडल्या जाते.

भारत हा देश अनेक जाती, धर्म, वर्ण, वंश, यांचा समन्वयक भूमी आहे. भारतातील राजकारण काही धर्म-जातींनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यापैकी एक महाराष्ट्रातील आदिवासी समाज आहे. महाराष्ट्र विधिमंडळात आदिवासी समाजाचे नेतृत्व कमी प्रमाणात असल्याचे दिसते.

आरक्षित असलेल्या मतदार संघात निवडून येऊन विधिमंडळात कामकाजात सहभागी होत असतात. विविध कल्याणकारी योजना राबविणे, जनतेचे प्रश्न सोडविणे तसेच आपल्या राज्यामधील आदिवासी समुदायाच्या हिताच्या दृष्टीने विविध कार्य करणे, एक प्रकारे विधानसभा सदस्य म्हणून जनता व राज्य सरकार यांच्या मधील दुआ म्हणून काम करते.

राज्य विधिमंडळावर प्रकाश टाकल्यास असे दिसून येते की, राज्यामधील विविध प्रश्नावर अभ्यास करण्यात आला आहे. परंतु महाराष्ट्र विधिमंडळात आदिवासी समाजाच्या लोकप्रतिनिधीच्या कामकाजावर संशोधन झाल्याचे दिसून येत नाही म्हणून या दृष्टीने विचार केल्यानंतर मी प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्र विधिमंडळ कामकाजातील आदिवासी सदस्यांचा सहभाग : एक चिकित्सक अभ्यास (विशेष कालखंड 2009 ते 2019) हा विषय निश्चित केला आहे.

❖ संशोधन समस्या

विधानसभा राखीव मतदार संघामुळे आदिवासी समाजाचे सदस्य राज्य विधिमंडळात जनतेचे नेतृत्व करत आहे ही मोठी बाब आहे. पण आपल्या अधिकाराचा प्रभावीपणे वापर करतात का ? कार्यकारी मंडळामध्ये त्यांना स्थान मिळते का ? विविध समित्यावर कार्य करण्याची संधी त्यांना मिळते का ? ही संशोधन समस्या आहे. आदिवासी प्रतिनिधी जेव्हा सभागृहात एखादी भूमीका मांडतात तेव्हा कसा प्रतिसाद मिळतो, आदिवासी समाजाचे नेतृत्व राखीव जागा म्हणून विधानसभेत जाते पण खरोखरच आपल्या कार्य कर्तृत्वाने प्रगल्भ नेता म्हणून पुढे येतो का ? येत असेल तर काय मर्यादा आहेत. आदिवासी नेतृत्व खरोखरच आपल्या मतदार संघाचे व आदिवासीचे लोकांचे प्रतिनिधित्व करतात का ? ही संशोधन समस्या आहे.

❖ संशोधनाचे महत्त्व

1. दिवासी नेतृत्वाच्या विधिमंडळातील सहभागाचा पातळीचा शोध घेऊन त्यातील समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय करण्याचा दृष्टीने हा विषय महत्वाचा आहे.

2. विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाने जे कार्य केलेले आहे ते इतरांसमोर येऊन इतरांना दिशादर्शक करण्याच्या दृष्टीने हा अभ्यास विषय महत्वाचा आहे.

3. विधिमंडळातील कामकाजातील पध्दती जाणून घेण्याचा दृष्टीने हा अभ्यास विषय महत्वाचा आहे.

4. महाराष्ट्र विधिमंडळामध्ये आदिवासी लोकप्रतिनिधीना आदिवासी समाजासाठी, आदिवासी विकासासाठी किती योगदान दिले हे तपासण्याच्या दृष्टीने हा विषय महत्वपूर्ण आहे.

❖ संशोधनाचे उदिष्टे

1. आदिवासी नेतृत्वाने सभागृहात उपस्थित केलेल्या प्रश्नांचा गुणात्मक दर्जा तपासणे.
2. आदिवासी नेतृत्व सभागृहात योग्य पध्दतीने संसदीय आयुधांचा वापर करतात का ? हे जाणून घेणे.
3. राज्यातील महत्वाच्या प्रश्ना संबंधी आदिवासी नेतृत्वाची सभागृहातील भूमिका व कार्य जाणून घेणे.
4. मागासवर्गीय, दलितांच्या प्रश्नांसंबंधी आदिवासी नेतृत्वाची भूमिका आणि कार्य जाणून घेणे.
5. सभागृहात आदिवासी समाजाच्या हिताचे करणारे ठराव, प्रस्ताव मांडतात का ? याचा अभ्यास करणे.
6. आदिवासी नेतृत्वाच्या सभागृहातील संपादणुकीचा अभ्यास करणे.

❖ संशोधनाची गृहीतके

1. आरक्षण धोरण आदिवासी समाजाचे नेतृत्व विधिमंडळात पोहचण्यास कारणीभूत आहे.
2. आदिवासी नेतृत्व मतदार संघातील प्रश्नाबरोबर राज्याच्या व इतर मतदार संघातील प्रश्नाबाबत कार्य व भूमिका पार पाडणे.
3. आदिवासी नेतृत्व प्रश्न सोडविण्यासाठी विधिमंडळात संसदीय आयुधांचा वापर करतात.
4. आदिवासी नेतृत्वाचे विधिमंडळातील कार्य व्यापक स्वरूपाचे राहिले आहे.
5. आदिवासी नेतृत्व दलित, मागासवर्गीयांचे प्रश्न सभागृहात उपस्थित करतात.

❖ संशोधन पध्दती

प्रस्तुत शोध प्रबंधाचा विषय महाराष्ट्र विधिमंडळ कामकाजातील आदिवासी सदस्यांचा सहभाग : एक चिकित्सक अभ्यास (विशेष कालखंड 2009 ते 2019) या विषयाच्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. महाराष्ट्र विधिमंडळ कामकाज व सहभागाचा अभ्यास करण्यासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. तसेच आदिवासी नेतृत्वाची नेतृत्वाची जडण - घडण जाणून घेण्यासाठी विविध ग्रंथालयीन संदर्भ चा अवलंब करण्यात करण्यात येणार आहे.

❖ संशोधन क्षेत्र

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्र विधिमंडळ कामकाजातील आदिवासी सदस्यांचा सहभाग : एक चिकित्सक अभ्यास (विशेष कालखंड 2009 ते 2019) या विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधिमंडळातील 2009 ते 2019 या दहा वर्षातील कालखंडातील आदिवासी लोकप्रतिनिधीचा विधीमंडळ कामकाजा मधील सहभागाचा व नेतृत्वाचा अभ्यास केला जाणार आहे.

❖ तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक व द्वितीय साधनांचा उपयोग करण्यात येईल. प्राथमिक साधनांमध्ये विधिमंडळातील आदिवासी लोकप्रतिनिधीच्या मुलाखती, प्रश्नावली, चर्चा, विचार, विनिमय करून तथ्य संकलन करण्यात येईल.

द्वितीय साधनांमध्ये शासकीय अहवाल, मासिके, वृत्तपत्रे, विधिमंडळ कामकाजाच्या लेखी दस्तऐवजांचा आधार घेतला जाईल. आदिवासी समाजाशी संबंधित लिखित साहित्य, ग्रंथ, इंटरनेट या सारख्या दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे.

❖ तथ्यांचे विश्लेषण

प्रस्तुत संशोधन विषयात संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्यांचे संकलन केले जाणार आहे आणि या संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

❖ **प्रकरणाची रूपरेषा**

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी व पैलू लक्षात घेता अभ्यासाकरिता विषयाची मांडणी सहा प्रकरणात केलेली आहे.

➢ **प्रकरण पहिले : प्रस्तावना**

पहिल्या प्रकरणामध्ये विषयप्रवेश, संशोधन समस्या, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधन पध्दती, तथ्य संकलन, तथ्य विश्लेषण, अध्ययन क्षेत्र, व संशोधन आराखडा इत्यादी घटकाची चर्चा करण्यात येईल.

➢ **प्रकरण दुसरे : विधिमंडळ कामकाज, स्वरूप व व्याप्ती**

प्रस्तुत संशोधन विषय हे आदिवासी नेतृत्वाच्या विधिमंडळातील कामकाजावर आधारित आहे. विधिमंडळ कामकाज कोणत्या पध्दतीने चालते. तसेच राज्यपाल अभिभाषण, अल्पसुचना प्रश्न, प्रश्नोतर तास तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, मंत्रिमंडळातील अविश्वास प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, स्थगन प्रस्ताव, अनुदान मागण्या अशा बाबींचा आढावा घेण्यात येईल.

➢ **प्रकरण तिसरे : राजकीय नेतृत्वाची संकल्पना व आदिवासी नेतृत्वाची जडण-घडण**

प्रस्तुत प्रकरणामध्ये नेतृत्व म्हणजे काय, त्याचा अर्थ, नेतृत्व निर्मितीचे घटक, राजकीय नेतृत्वाची कार्य याचा अभ्यास करणार आहोत.

तसेच या प्रकरणामध्ये दुसऱ्या भागात आदिवासी नेतृत्वाची जडणघडण कशी झाली, याची माहिती घेणार आहोत. यामध्ये आदिवासी समाजाचा अर्थ, वैशिष्ट्ये, संस्कृती, जीवनपद्धती, समस्या, आदिवासी समाजाची स्थिती याची माहिती अभ्यासणार आहोत.

➢ **प्रकरण चौथे : महाराष्ट्र विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाची कार्य व भूमिका 2009 ते 2014**

प्रस्तुत प्रकरणामध्ये 2009 ते 2014 या पाच वर्षातील कालखंडातील विधीमंडळात आदिवासी लोकप्रतिनिधीनी केलेल्या कार्याचा अभ्यास करणार आहोत.

- **प्रकरण पाचवे : महाराष्ट्र विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाची कार्य व भूमिका 2014 ते 2019**

प्रस्तुत प्रकरणात 2014 ते 2019 या पाच वर्षातील विधिमंडळात आदिवासी लोकप्रतिनिधीनी केलेल्या कार्याचा अभ्यास करणार आहोत.

- **प्रकरण सहावे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी**

प्रस्तुत संशोधन प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणांमध्ये अभ्यास विषयांमधून निष्पन्न झालेले सारांश, निष्कर्ष गृहीतकर्त्याची पडताळणी आणि त्यावर आधारित महत्वपूर्ण शिफारशी केल्या जाणार आहेत.

❖ संदर्भग्रंथ सूची :

1.डॉ.प्रदीप आगलावे-सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे, साईनाथ प्रकाशन, नागपूर

2.डॉ.संतोष खिराडे, जयश्री पाटील - संशोधन पद्धती व संशोधन प्रकाशनाचे नीतीतत्वे, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

3.डॉ.भांडारकर पू.ल.- सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर

4.डॉ.गोविंद गारे - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे

5.डॉ.दा.धो. काचोळे-आदिवासी समाजशास्त्र, कैलास पब्लिकेशन, गोकुळवाडी औरंगपुरा-औरंगाबाद

6.डॉ.घायाळ एस.पी.-आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, अरुणा प्रकाशन

7.रविकिरण साने, नीलिमा साने -महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण डायमंड पब्लिकेशन

8.डॉ.वा.भा.पाटील- महाराष्ट्र प्रशासन प्रशांत पब्लिकेशन

9.डॉ.भास्कर लक्ष्मण भोळे-भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंगळापुरे प्रकाशन, नागपूर

10.डॉ.अजय गव्हाणे-संसदीय लोकशाहीची आयुधे, क्रिएटिव्ह पब्लिकेशन

11.के.टी.गिरमे- विधानसभा परिचय आणि कामकाज

12.प्रा.बी.वाय.कुलकर्णी- भारतीय शासन आणि राजकारण

13.प्रा.बी.बी.पाटील -भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर

14.दैनिक लोकसत्ता

15.दैनिक लोकमत

16.दैनिक सकाळ

17.लोकराज्य

18.इंटरनेट

संशोधक

गारोळे पिराजी गंगाधर
एम.ए.(राज्यशास्त्र)सेट,बी.एड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.भालेराव सुरेश सखाराम
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
बी रघुनाथ महाविद्यालय,परभणी